या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार २५ जून २०२४ | अंक१९८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# मी एकटा पडलोय:माझी जात संकटात सापडली आहे मनोज जरांगे यांचं मराठा बांधवांना आवाहन ?

## आरक्षणापेक्षा पद आणि मते मोठे आहेत काय?

**महाराष्ट्रातील मराठा समाजांना सांगतो आणि नेत्यांनाही सांगतो. सर्व पक्षातील ओबीसी नेते मराठ्यांना कायदेशीर आरक्षण देऊ नये म्हणून एकवटले आहेत. ते मतांचा विचार करत नाही, ते आरक्षणाचा विचार करत आहेत. मराठा नेते मतांचा विचार करत आहेत. आरक्षणाचा विचार करत नाहीत. ओबीसी नेत्यांना मतांची गरज नाही. त्यांना आरक्षण हवं आहे. यावरून आरक्षण किती मोठा मुद्दा आहे हे लक्षात घ्या. सर्वच पक्षातील ओबीसी नेते एकत्र आले आहेत. विरोधी पक्षातील ओबीसी नेतेही एकत्र आले आहेत. कोणीही पक्षाला जुमानत नाहीत. सर्व ओबीसी नेते एकवटले आहेत. म्हणजे मराठा नेत्यांना समजत नाही का? ते मताला आणि पदाला किंमत देत नाही. तुम्ही का करत नाही? तुम्हाला कळत नाही का?, असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला.**



मनोज जरांगे पाटील यांनी एक महिन्यासाठी उपोषण स्थगित केलं असलं तरी आंदोलन मात्र सुरूच आहे. मराठा समाजात जनजागृती करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी कंबर कसली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलेल्या डेडलाईनच्या आधी मोठी रॅली काढण्याचा निर्णय घेतला आहे. आठ दिवस ही रॅली चालणार आहे. सरकारवर दबाव आणण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी ही रॅली काढण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. या रॅलीत महिला आणि पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचं आवाहन जरांगे पाटील यांनी केलं आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मीडियाशी संवाद साधताना हे आवाहन केलं आहे. 6 जुलै ते 13 जुलै पर्यंत शांतता जनजागरण रॅली आयोजित करण्यात आली आहे. त्या रॅलीला या. शांततेत या. 6 जुलैपर्यंत सर्व कामे आटोपून घ्या. त्या दिवशी एकानेही घरात थांबू नका. लग्न कार्यालाही जाऊ नका. ताकदीने रस्त्यावर या. आपल्याला घेरलंय. मी एकटा पडलोय. मी हटणार नाही. मेलो तरी मी मागे हटणार नाही.

### मी एकटा पडलोय

मी आता एकटा पडलो आहे. मी आरक्षणाच्या बाजूने राहू नये म्हणून मला घेरलं आहे. आपण एकजूट राहा. मराठा नेत्यांना आवाहन करतोय की, जातीचं आरक्षण मोठं आहे. तुम्ही पद आणि मतांकडे पाहू नका. हात जोडून विनंती आहे. माझी जात संकटात सापडली आहे. ताकदीने उभं राहा. हसण्यावर नेऊ नका, असं ते म्हणाले.

आपल्या रॅलीला आया बहिणींसह सर्वांनी एकत्र या. शांतता राहिली अत्यंत मोठी झाली पाहिजे, असं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे.

## टाकरवनला रासायनिक खताची टंचाई अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष


टाकरवन/प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथे ऐन पावसाळ्यातच रासायनिक खताची टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे तरी अधिकाऱ्यांचे या कामी दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, टाकरवन व परिसरातील शेतकऱ्यांना कपाशी , सोयाबीन, ऊस व अन्य पिकांना सध्या खताची मात्रा देण्याची वेळ आहे परंतु येथील कृषी केंद्राकडे शेतकऱ्यांना पाहिजे ती खते मिळत नसुन ईतर खते दुकानदार घेऊन जा असे म्हणत आहेत शेतकरयांना पाहिजे ते खते मिळत नसून इतर कंपन्यांचे खते मात्र ज्यादा दराने विक्री केली जात आहेत युरिया खताची शासनाच्या दरात विक्री केली जात असताना त्यासोबत इतर खते घ्या म्हणून आग्रह धरला जात असून ती शेतकऱ्यांच्या माथी मारली जात आहेत कंपनीच्या डीलर कडे सुद्धा खताचा तुटवडा आहे तरी संबधीत अधिकार्यांनी लक्ष देऊन लवकरात लवकर खताची टंचाई दूर करावी अशी मागणी शेतकरी वर्गात होत आहे.




## वाटर ने केले आजून एका व्यवसायात प्रोत्साहन आणि मार्गदर्शन – डॉ कवठेकर सरपंच पिट्टी

**पाटोदा प्रतिनिधी :-** पाटोदा... वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या शाश्वत उपजिविका प्रकल्पा अंतर्गत निर्मल गंगा वॉशिंग डिटर्जन पाउडर तयार करून केली व्यवसायाला सुरूवात . उखांडा येथील श्री व सौ मिनाताई संजय खांडेकर या दामपत्याने वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या शाश्वत उपजिविका प्रकल्पा अंतर्गत महिला गटांना वॉशिंग पावडर बनवन्याचे ट्रेनिंग बोरखेड बळीराजा कृषि विज्ञान मंडळ येथे दिले होते त्यावेळी ट्रेनिंगसाठी वॉटरशेड टिम मेंबर श्री भरत कवठेकर सरांना संपर्क साधून उखांडा येथील श्री व सौ खांडेकर दामपत्याने उखांडा येथुन मोटारसायकल वर प्रवास करून ट्रेनिंग घेतले होते... त्याचे फलित निर्मला गंगा वॉशिंग डिटर्जन पावडर निर्मिती करून केले... आपण ठरवले तर काही करू शकतो फक्त प्रबळ ईच्छाशक्ती पाहिजे.... खुप खुप अभिनंदन श्री व सौ खांडेकर दामपत्य... पुढील व्यवसायासाठी खुप खुप शुभेच्छा....महिला गटांना वॉटर संस्थेच्या माध्यमातून व्यावसायिक प्रशिक्षण देऊन आर्थिक उन्नती साधन्याचा प्रयत्न करत आहेत वॉटरशेड टिम श्री कैलास पन्हाळकर,श्री राजेंद्र जाधव,श्री अनिल पालवे,श्री भरत कवठेकर श्री युनुस शेख व टिम...






## एसी,एसटी,व्हीजीएनटी,इबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शासकीय वस्तीगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

बीड, दि. 24 : सामाजिक न्यायविशेष सहाय्य विभाग अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृह, मोंढा बीड येथे कार्यरत असून या वस्तीगृहाची प्रवेश क्षमता 75 असून सदर वस्तीगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली असून या वस्तीगृहात एसी,एसटी,व्हीजीएनटी,इबीसी इत्यादी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या वस्तीगृहात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना मोफत भोजन व निवास सुविधा पुरविले जाते.

निर्वाह भत्ता, स्टेशनरी इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. इच्छुक विर्थ्यांनी संबधित कार्यालयाशी संपर्क साधून प्रवेश अर्ज घेऊन जावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त व बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृहाचे गृहपाल बीड यांनी केले आहे. संपर्कासाठी मोबाईल क्रमांक 99 22633468 यावर संपर्क साधावा.

## संजय शिवलाल गोमलाडू यांची "प्रशासकीय अधिकारी" पदी निवड



गंगापूर/प्रा.संजय तुपे सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय ,राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय आणि राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय, तसेच स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय घोडेगाव ता. खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे "प्रशासकीय अधिकारी " म्हणून संजय शिवलाल गोमलाडू यांची निवड संस्थापक अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव व संस्थेचे इतर पदाधीकारी यांनी केली.

# बीड व अंबाजोगाई येथील सैनिकी वसतीगृहात प्रवेश पक्रीया सुरु

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 24 : जिल्ह्यातील समस्त आजी,माजी सैनिक, युद्धविधवा, विधवांना वर्ष 2024-25 या शैक्षणिक वर्षाकरिता बीड व अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांचे वस्तीगृह दिनांक 1 जुलै 2024 पासून पूर्ण क्षमतेने सुरू होत आहे.

सदरचे वस्तीगृहामध्ये आजी,माजी सैनिक युद्धविधवा, विधवांचे पाल्य बीड अंबाजोगाई येथे शिकत आहेत त्यांना प्रवेश दिला जातो. ज्या आजी, माजी सैनिक, युध्द विधवा, विधवांच्या पाल्या पाल्यांना अति अल्प दरामध्ये सैन्याच्या रँकनुसार भाडे आकारले जाते व विधवांच्या पाल्यांना वस्तीगृहमध्ये विनामूल्य प्रवेश दिला जातो. प्रवेशासाठी प्रवेश पुस्तिका वस्तीगृह अधीक्षक यांच्याकडे उपलब्ध आहेत. तरी इच्छुक आजी, माजी सैनिक, युद्धविधवा, विधवा, इतर नागरिक पाल्यांनी वस्तीगृहामधून प्रवेश पुस्तिका खरेदी करून आपले प्रवेश दिनांक 30 जून 2024 पर्यंत निश्चित करावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी वस्तीगृह अधीक्षक बीड मोबाईल क्रमांक 94048 62613 वस्तीगृह अधीक्षक अंबाजोगाई 9689894015 आणि दूरध्वनी क्रमांक 02442-22105 या क्रमांकावर संपर्क साधावा.

संपादकीय

## दिलखेचक वेशभूषा आणि केशभूषाकर्ते!

[मायकेल जॅक्सन पुण्यतिथी विशेष.]

मृत्यूपश्चात देखील मायकेल जॅक्सनच्या ध्वनिफितींची विक्री, शिफारशी आणि मैफलींतून त्यांना मिळणारे वार्षिक मानधन सन १९८९मध्ये सुमारे १२५ दशलक्ष डॉलर्स होते. ऑगस्ट २०१८मध्ये फोर्ब्स मासिकाच्या यादीनुसार त्यांची एकूण कमाई ४.२ अब्ज डॉलर्स झाली होती. सन २०१६मध्ये जॅक्सन इस्टेटकडून वार्षिक एकूण कमाईची अंदाजे किंमत ८२५ दशलक्ष डॉलर्स इतकी होती, त्यामुळे सन २०१९मध्ये फोर्ब्सने जॅक्सनना सन २०१२ वगळता प्रत्येक वर्षी जगातील अव्वल कमाई करणारा मृत कलाकार म्हणून मान्यता दिली. सदर माहितीपूर्ण लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी प्रस्तुत करताहेत... संपादक.

मायकल जॅक्सन हे एक जगप्रसिद्ध अमेरिकन पॉप गायक, गीतकार आणि नर्तक. किंग ऑफ पॉप याबरोबरच द ग्लोव्ह वन, वॉको जॅको, एमजे, जॅको, मिकी माईक, ऍपलहेड, स्मिली अशा अनेक टोपणनावानेही ते प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म अमेरिकेतील शिकागोजवळील इंडियाना येथील गॅरी या गावात झाला. जॅक्सन स्ट्रीटवर एका श्रमिक वर्गातील आफ्रिकन-अमेरिकन कुटुंबामध्ये जन्मलेले मायकल हे जॅक्सन कुटुंबातील दहा मुलांपैकी आठवे मुलगे होते. त्यांना रेबी, लातोया आणि जेनेट या तीन बहिणी आणि जॅकी, टीटो, जर्माइन, मार्लन आणि रँडी हे पाच भाऊ. त्यांची आई कॅथरीन एस्तेर जॅक्सन या क्लॅरिनेट आणि पियानो वाजवत असत. त्यांचे वडील जोसेफ हे निवृत्त मुष्टियोद्धा होते. चरितार्थाकरिता ते क्रेन ऑपरेटरचे काम करीत. तसेच स्थानिक रिदम अँड ब्लूज बँडमध्ये गिटार वाजवित असत. जोसेफ आणि त्यांचे भाऊ ल्यूथर यांनी इतर सहकाऱ्यांसमवेत द फॅल्कन्स नावाचा बँड काढला. काही कालावधीनंतर तो बंद पडला; पण त्यांच्या गाण्याच्या तालमींमुळे या मुलांच्या मनात गायन, वादन यांबद्दल आकर्षण निर्माण झाले व त्यांचे संगीताचे उपजत कलागुण हळूहळू वाढीस लागले. त्यांच्या आईवडिलांनी त्यांना घरीच संगीताचे शिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यांच्या वडिलांनी या भावंडांना गायन, नृत्य, प्रत्यक्ष रंगमंचावर कसे वावरावे, सादरीकरण कसे करावे यांचे प्रशिक्षण दिले; पण याचबरोबर या सर्व भावंडांचे बालपण त्यांच्या वडिलांच्या विक्षिप्त स्वभावामुळे अतिशय खडतर परिस्थितीतही गेले. यामुळे बहुतांशी मुलांचा स्वभाव विशेषतः मायकल यांचा स्वभाव काही प्रमाणात मनस्वी बनला.

दि.२९ ऑगस्ट १९५८ रोजी शिकागो नजीक एका लहानश्या गावात मायकल जैक्सनचा जन्म झाला. आफ्रिकन-अमेरिकन कामगारवर्गाच्या कुटुंबात जन्मलेला तो जोसेफ वॉल्टर- जो जॅक्सन आणि कॅथरीन एथर स्क्रूज यांचा दहा मुलांपैकी आठवा होता. त्यांचे वडील स्टील गिरणी कामगार म्हणून काम करत असत, त्याची आई एक प्रामाणिक यहोवाची साक्षीदार होती. केथरीन या मायकलच्या आईला संगीताची फार आवड होती, मायकलला संगीताच्या आवडीचे बाळकडू हे घरातूनच मिळत गेले.

## प्रयत्नात सातत्य ठेवल्यास यश मिळते:सागर धस

# मंझरी येथील ऋषीकेश गितेची लेखाधिकारीपदी निवड



बीड, : ग्रामीण भागातील मुलांच्या वाट्याला प्रचंड मोठा संघर्ष येतो. बिकट परिस्थितीशी झुंजत ग्रामीण भागातील मुले स्वतःचे शिक्षण पूर्ण करतात. त्यांचे यश हे त्यांच्या संघर्षात असते. ऋषी गीतेच्या वाट्याला असाच संघर्ष. त्याच्या संघर्षाचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे उद्गार सागर धस यांनी काढले. पाटोदा तालुक्यातील मंजुरी घाट येथील रहिवाशी ऋषी आबासाहेब गीते याची वन विभागातील अकाउंटपदी नियुक्ती झाली. त्यानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने त्याच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार समारंभाच्या निमित्ताने सागर धस बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले जिल्हा परिषद माजी सभापती महेंद्र गर्जे यांनीही मार्गदर्शन केले. ते म्हणाले,स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी व्हायचं असेल तर चिकाटी आणि जिद्द असावी. ध्येयाप्रती निष्ठा असावी. यानंतर डेप्युटी लेबर कमिशनर अभय गीते, गहिनीनाथ नागरगोजे दुय्यम दुय्यम निबंधक उत्पादन शुल्क, सिताराम गड खर्डा येथील इंगोले महाराज, ज्येष्ठ विस्तार अधिकारी बापूराव राख यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर ऋषी गिते याने मनोगत व्यक्त केले. आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणं सोप्प नसतं पण निरंतर कष्ट चिकाटी असेल तर नक्कीच ध्येयापर्यंत पोहोचता येते. त्यामुळे खेड्यातील मुलांनी न्यूनगंड न बाळगता परिश्रम घेऊन यश संपादन करावे.

या कार्यक्रमाला वरील मान्यवरासह सपोनि साबळे , सरपंच सौ.सिंधुताई गीते, उपसरपंच प्रकाश नांदे, तंटामुक्त अध्यक्ष कुमार नांदे, माजी सरपंच बाळासाहेब नांदे, बबन गीते, सुभाष गीते, ग्रामपंचायत सदस्य संतोष चोले, पोपट गीते, चेअरमन तुळशीराम गीते, दत्ता गीते,शाळेचे मुख्याध्यापक धांडे, सहशिक्षक माळकर, बाबासाहेब गिते, दादासाहेब गिते यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# मंगळवेढा आगारा मार्फत एसटीचा पास आपल्या शाळेत उपक्रम.

सोलापूर/विश्वास चोपडे

यंदा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री माधव कुसेकर यांनी शालेय विद्यार्थ्यांना विद्यार्थी पास प्रत्येक शाळेत जाऊन देण्याचा निर्णय घेतलेला आहे. याचा लाभ प्रत्येक शाळेने घेतलेला असून रा. प. मंगळवेढा आगाराने मंगळवेढा शहर व तालुक्यातील शाळांना भेटी देऊन विद्यार्थी व विद्यार्थिनींना शालेय पासाचे वाटप केलेले आहे. यामध्ये मंगळवेढ्यातील इंग्लिश स्कूल, श्री संत दामाजी महाविद्यालय, श्री संत दामाजी हायस्कूल, जवाहरलाल शेतकी



हायस्कूल, नूतन मराठी विद्यालय, महाराणी ताराबाई हायस्कूल, पार्वती ताड खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ज्ञानदीप प्रशाला, प्रायमा टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट तसेच तालुक्यातील श्री सिद्धेश्वर विद्यामंदिर माचनूर, शरद पवार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शरद नगर, कै. दत्ताजीराव भाकरे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, आंधळगाव, इंग्लिश स्कूल व जुनिअर कॉलेज भोसे, स्वामी विवेकानंद विद्यालय गुंजेगाव, विद्या मंदिर हायस्कूल व ज्युनियर कॉलेज,सलगर बु. इत्यादी शाळा-कॉलेजला भेट देऊन शालेय पासेसचे वाटप केले आहे. विभाग नियंत्रक श्री विनोदकुमार भालेराव व विभागीय वाहतूक अधिकारी श्री अजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढा आगाराचे आगार व्यवस्थापक संजय भोसले, सहाय्यक वाहतूक अधीक्षक शरद वाघमारे, वाहतूक निरीक्षक योगेश गवळी तसेच इतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड (पूर्व ) अंतर्गत अंबाजोगाई शहर शाखेच्या वतीने युवती धम्म प्रशिक्षण शिबिर संपन्न

**बीड/प्रतिनिधी**

दिनांक २३/०६/२०२४ रविवार रोजी, 'संबोधी बुद्ध विहार' भीमनगर (परळी वेस ), अंबाजोगाई येथे एक दिवसीय " युवती धम्म प्रशिक्षण" शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात एकूण ३५ युवतींनी सहभाग घेतला. या शिबीरासाठी आद. ज्योतीताई कुंटे (केंद्रीय शिक्षीका , मा. श्रामणेरी व जिल्हा सरचिटणीस, नांदेड) यांनी १) अर्थासह त्रिसरण व पंचशील, २) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र ३) भगवान बुद्धांचे चरित्र ; या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर आद. संजिवनीताई धन्वे (केंद्रीय शिक्षीका व उपाध्यक्ष महिला ता. अंबाजोगाई ) यांनी ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रियांना संदेश ; या विषयांवर सखोल मार्गदर्शन करून सांस्कृतिक कार्यक्रम घेतला . या कार्यक्रमाचे अध्यक्षपद शहर शाखा अध्यक्षा, आद . भावनाताई कांबळे यांनी भूषविले. जिल्हाध्यक्ष आद. बी. बी. धन्वे यांनी शिबीराचे उदघाटन केले. आपल्या उदघाटनपर मार्गदर्शनात युवतींच्या भावी जिवनात या शिबीराचा कसा उपयोग होईल हे समजाऊन सांगितले. संपूर्ण शिबीराचे बहारदार सूत्रसंचालन आद. जयश्रीताई गावडे यांनी केले. ता. शाखेचे संस्कार उपाध्यक्ष, आद. प्रा. डॉ. किर्तीराज लोणारे यांनी तथागत भ. बुद्धांनी स्त्रियांना व मुलींना केलेला उपदेश व पत्नींचे प्रकार सांगून मार्गदर्शन केले. जिल्हा ऑडीटर आद. एम. वाय. काळे यांनी युवतींना पंचशील व बाविस प्रतिज्ञांचे आचरण करून आदर्श बौद्ध युवती बनावे; अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच आद. रमेशराव सिरसट ( पोलीस उप निरीक्षक ) यांनी सर्व शिबीरार्थी व सर्व उपस्थितांना स्वादिष्ट भोजन देऊन आपली दान पारमिता पालन केली ; याबद्दल त्यांचे व त्यांच्या आई आद. शकुंतलाआई सिरसट , व पत्नी आद. बबितताई सिरसट तसेच आद.



अनितताई विद्यागर, आद. मोनिकाताई सिरसट, आद. मिनाताई सुशांत वेडे यांचे व सर्व उपस्थितांचे संस्थेच्या वतीने आभार मानले. या शिबीरासाठी आद. एस. एस. सोनवणे (जिल्हा पर्यटन उपाध्यक्ष ), आद. सुधाताई जोगदंड (मा. संघटक, जि. बीड पूर्व ), आद, डी. एन. घोबाळे (ता. अध्यक्ष, अंबाजोगाई), आद. प्रा. श्रीपतराव वाघमारे (कोषाध्यक्ष, ता. अंबाजोगाई ), आद. अरूणाताई वाघमारे ( संस्कार उपाध्यक्ष, अंबाजोगाई शहर), आद पुष्पाताई गायकवाड (पर्यटन उपाध्यक्ष अंबाजोगाई शहर ), आद रत्नमालाताई तरकसे ( संस्कार सचिव अंबाजोगाई शहर ),आद उर्मिलाताई वैद्य (संघटक अंबाजोगाई शहर), आद. सुशिलाताई वेडे ( संघटक अंबाजोगाई शहर ) उपस्थित होते. शिबीराच्या शेवटच्या सत्रात कु. आदिती भीमराव वाघमारे, कु. अपूर्वा उमेश गाडे, कु. साक्षी सुशांत वैद्य, कु. तमन्ना बाबासाहेब वेडे या युवतींनी आपले मनोगत व्यक्त करून, हे शिबीर आमच्या आयुष्यात खूप उपयोगी पडेल, असा विश्वास व्यक्त केला व आम्हाला शिबीर देऊन उपकृत केल्याबद्दल भारतीय बौद्ध महासभा या धम्म संस्थेचे व जिल्हा, तालुका व शहर शाखा पदाधिकारी यांचे आभार मानले. आद. रमेशराव सिरसट यांनी अन्नदान देऊन दान पारमिता पूर्ण करण्याचे कुशल कर्म करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भारतीय बौद्ध महासभा या मातृसंस्थेचे व पदाधिकारी यांचे आभार मानले . हे शिबीर यशस्वी करण्यासाठी गौतमी महिला मंडळ भीमनगरच्या आद. उर्मिलाताई वैद्य, आद. शकुंतलाताई वेडे ,आद. पार्वतीताई वेडे , आद. मंगलताई बचाटे, आद. कांताताई बोराडे , आद. सारिकाताई ठोके , आद. अविदाताई वेडे, आद. सिताताई मस्के, आद. मिराताई गाडे आद. दीक्षाताई आदमाने, आद. सिमाताई वैद्य , आद. चंद्रकलाताई वेडे , आद. लक्ष्मीताई वैद्य, आद. ज्योतीताई वैद्य ,आद. लंकेश वैद्य सर , आद. व्यंकटराव वेडे सर आद. शशिकांत सोनकांबळे व कुलदीप वैद्य यांनी परिश्रम घेतले.

# न्यु इंटेल कॉम्प्युटर्सच्या वतीने संगणक प्रशिक्षणार्थी व पालकांचा सत्कार

**केज/प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सुप्रसिद्ध संगणक प्रशिक्षण संस्था न्यु इंटेल कॉम्प्युटर्सच्या वतीने सारथी योजने अंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा केज तहसीलच्या नायब तहसीलदार आशा वाघ व नायब तहसीलदार धस साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील न्यु इंटेल कॉम्प्युटर्सच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनानिमित्त" छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून वरिष्ठांच्या आदेशानुसार छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) ही महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत काम करणारी स्वायत्त संस्था आहे. महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी (लक्षित गट) या समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी सारथी संस्था कामकाज करीत आहे. लक्षित गटातील विद्यार्थ्यांच्या संगणकीय कौशल्य, इंग्रजी भाषा कौशल्य व संवाद कौशल्य विकासासाठी सारथी संस्थेमार्फत महाराष्ट्रातील ५०,२५० विद्यार्थी हे "छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम" (CSMS-DEEP) अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व ३५८ तालुक्यात MKCL च्या ३१०० प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण घेत आहेत. हे सर्व विद्यार्थी नॉन क्रिमिलियर संवर्गातील आहेत व त्यांच्या घरी संगणकीय ज्ञानाचा सराव करण्यासाठी कोणताही लॅपटॉप किंवा डेस्कटॉप उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्रशिक्षण वर्गात शिकलेल्या बाबीचा सराव करण्यासाठी "सरसेनापती वीर बाजी पासलकर सारधी संगणक शिकता शिकता कमवा" योजना सुरू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांनी शिकलेल्या विविध संगणक ज्ञानाच्या माध्यमातून जनतेची विविध कामे उदा. आधार कार्ड काढणे, पॅनकार्ड काढणे, विविध शासकीय योजनांचे



ऑनलाईन फॉर्म भरणे, DTP करणे इत्यादी कामें करून त्याबदल्यात योग्य तो मोबदला घेणे या उपक्रमांतर्गत अभिप्रेत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे आराध्य दैवत ही आपली आई राजमाता जिजाऊ माँसाहेब होत्या. याची आठवण म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनाच्या दिवशी या योजनेत सहभागी विद्यार्थी आपल्या पहिल्या स्वकमाईतून दिनांक ०७ ते २१ जून २०२४ दरम्यान आपल्या आईला साडी घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेला आदर्श व संस्कार आचरणात आणणार आहेत. सारथी मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वा राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त "सरसेनापती वीर बाजी पासलकर सारथी संगणक शिकता शिकता कमवा" योजना अंतर्गत तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर सारथी व MKCL च्या माध्यमातून या उपक्रमात सहभागी आहेत. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी विविध बैठकांमध्ये सारथीच्या उपक्रमाचा प्रसार व प्रसिद्धी देण्याबाबतच्या सूचना सर्व विभागांना दिलेल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून न्यु इंटेल कॉम्प्युटर्सच्या वतीने संचालक गणेश सत्वधर सर यांनी संगणक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या मातांचा नायब तहसीलदार आशा वाघ व नायब तहसीलदार धस साहेब यांच्या हस्ते सत्कार केला.या उपक्रमाद्वारे मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी समाजातील तरुणांमध्ये स्थानिक पातळीवर संगणकीय कौशल्ये विकसित होवून त्याद्वारे रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करण्याच्या सारथीच्या या उपक्रमास नक्कीच बळ मिळणार आहे.

## आता शाळेला जायच कसं ? शाळे समोर पाणीच पाणी; विद्यार्थ्यांना रस्त्यावरून जाणेही कठीण



**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील शाळेमध्ये परिसरातील पाच तांड्यांसह दोन तीन गांवातील विदयार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात. परंतु, पावसाळ्यामध्ये शाळेच्या समोरील तसेच मैदानातही मोठया प्रमाणावर पाणी साचत असल्यामुळे विदयार्थ्यांना शाळेत जाणे कठीण झाले आहे.या रस्त्या बाबत गावकऱ्यांनी आमदार शामसुंदर शिंदे उमरा ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच, ग्रामसेवक यांच्याकडे वेळोवेळी मागणी करूनही रस्त्याबाबत व शाळेसमोर पाणी साचू नये या साठी गावकऱ्यांनी मागणी करूनही कुठलीच व्यवस्था "ना आमदाराने केली" "ना ग्रामपंचायतने" पण यात शाळकरी विद्यार्थ्यांना व गावातील नागरिकांना या गैरसाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

## गोगलगायी या किडीच्या नियंत्रणासाठी कृषि विभाग सज्ज आहे.

बीड, दि. 24 : बीड जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर/शेतात काही ठिकाणी गोगलगायी आढळून येत आहेत. त्यासाठी कृषि विभाग सज्ज झाला असून जिल्ह्यात 4150 किलो मेटाल्डीहाईड या कीटकनाशकाचा साठा राज्यस्तरावरून प्राप्त झाला आहे.

सदर साठा संबधित तालुका कृषि अधिकारी तसेच नजीकचे तालुका बीज गुणन केंद्र व शासकीय फळरोपवाटिका याठिकाणी ठेवण्यात आलेला आहे. त्यातून जिल्ह्यातील २०७५ एकर एवढ्या क्षेत्राचे सहज संरक्षण होईल. गोगलगायीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पेरलेल्या सोयाबीन शेताची विशेषता बांधाचे निरीक्षण करावे, बांध स्वच्छ ठेवावे, बांधावर गोगलगायी आढळल्यास शेतात संध्याकाळच्या वेळेस जागोजागी गवताचे ढीग अथवा गुळाच्या पाण्यामध्ये रिकामे बारदाने भिजवून ठेवावे. सकाळी त्या ढीगांखाली लपलेल्या गोगलगायी जमा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. नियंत्रणात्मक उपाययोजना म्हणून मेटाल्डीहाईड या कीटकनाशकाच्या गोळ्या २ किलो प्रती एकर या प्रमाणात बांधाच्या नजीकच्या भागात / प्रादुर्भावग्रस्त क्षेत्रात वापराव्यात. जेणे करून गोगलगायी या किडीचा प्रादुर्भाव रोखणेस मदत होईल. कीटकनाशक मुरमूऱ्यांना लावून शेतामध्ये फेकू नये, त्याने पशु-पक्षी यांना हानी होऊ शकते असाही सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

अधिक माहितीसाठी आपल्या स्थानिक क्षेत्राचे, कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांना संपर्क करावा तसेच अधिक तांत्रिक माहितीसाठी कृषि विज्ञान केंद्र डिघोळअंबा,ता.अंबाजोगाई वा कृषि विज्ञान केंद्र खामगाव, ता.गेवराई येथील शास्त्रज्ञ यांचेशी संपर्क करावा. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड यांनी केले आहे.

## केज विधानसभा निवडणूक लढवणार- रमेश गालफाडे

**केज/प्रतिनिधी**

सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतील निष्क्रिय नेत्यांमुळे मतदार संघाचा विकास थांबला आहे. रस्ते,पाणी,वीज यासारखे मूलभूत प्रश्नदेखील आतापर्यंत सोडवले गेले नाहीत.आता संघर्षाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे आम्ही विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहोत,अशी माहिती बहुजन विकास परिषदचे संस्थापक अध्यक्ष रमेश तात्या गालफाडे यांनी 'माध्यमाशी' बोलताना दिली. एकाच घरात केज मतदार संघाचे राजकारण गेल्या काही वर्षांपासून फिरत आहेत.त्यामुळे केज-अंबाजोगाई मतदार संघाचे वाटोळे झाले असून दलित व इतर समाजाच्या सर्वांगिण विकासाचा विचारच केला जात नाही,ही मोठी शोकांतिका आहे.येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अशा भूलथापा देवून आणि पदर पसरुन मतांचा जोगवा मागितला जाणार आहे. त्यामुळे माझ्या बांधवांनी व मातामाऊलीनी अशा भूलथापांना बळी न पडता आपल्या हाकेला ओ देणाऱ्याशी पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.म्हणून मी रमेश गालफाडे केज विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. बीड जिल्हा हा दुष्काळी आणि ऊसतोड मजूरांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. रोजगारा अभावी येथील तरुणांचे मोठ्या



प्रमाणात पुणे-मुंबई सारख्या ठिकाणी मोठ्या संखेने स्थालांत्तर होत आहे.हे दुष्ट चक्र वर्षानुवर्षे चालत आहे.मात्र विकासाच्या गप्पा मारणारे आणि घराणेशाहीचे वर्चस्व स्थापन करणारे मतदार संघातील नेते यावर बोलायला तयार नसून त्यांना गोरगरिबांच्या प्रश्नांशी काही देणे-घेणे नाही.केवळ त्यांना त्यांच्या घरातच सत्ता कशी राहिल,यासाठी ते प्रयत्नशील असतात.निवडणुका आल्या की प्रत्येक समाजाचा झोला पांघरुन मतांचा जोगवा मागितला जातो आणि सर्व समाजही त्यांच्या नौटंकीला बळी पडतो.आपल्या केज मतदारसंघाचे व सर्व समाजाचे आजवर मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.आपले भविष्य उज्वल करायचे असेल आणि मतदार संघाचा विकास साधायचा असेल तर हीच नामी संधी असून आपल्याला परिवर्तन घडवून आणावे लागणार आहे.असे बहुजन विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेश तात्या गालफाडे यांनी म्हटले आहे.



परळी येथे दि २३ रोजी इंद्रायणी हॉस्पिटल च्या उद्घाटन प्रसंगी डॉ. उमेश मुंडे यांना शुभेच्छा देताना परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, इंजि. भगवान साकसमुद्रे, संपादक नितीन ढाकणे, कंत्राटदार बालासाहेब मुंडे आदी छायाचित्रात दिसत आहेत .

## बळीराजा शेतीकामात व्यस्त



पावसाची उघडीप मिळाल्याने डोंगर माथ्यावरती भात, भुईमुग कोळपणी सुरू असून शेतकरी वर्ग शेती कामात व्यस्त आहे. पिंपळवाडी तालुका राधानगरी येथे घेतलेले छायाचित्र .

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

मंगळवार २५ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# नीट पेपर फुटीचं लातूर कनेक्शन ; दोन शिक्षक ताब्यात

**नीट पेपरफुटीचे धागेदोरे थेट लातूरपर्यंत; बिहार कनेक्शनपाठोपाठ आता महाराष्ट्र कनेक्शन समोर, दोन शिक्षक घेतले ताब्यात ;वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या पेपरफुटीचे धागेदोरे आता लातूरपर्यंत पोहोचले आहेत. नांदेडच्या एटीएस पथकानं लातूरमध्ये दोन ठिकाणी छापे टाकून जिल्हा परिषदेच्या दोन शिक्षकांना ताब्यात घेतलं आहे.**






**लातूर/प्रतिनिधी**

वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या (नीट) पेपरफुटीचे धागेदोरे आता खासगी कोचिंग क्लासेसची फॅक्टरी बनलेल्या लातूरपर्यंत पोहोचले आहेत. नांदेडच्या एटीएस पथकाने लातूरमध्ये दोन ठिकाणी छापे टाकून जिल्हा परिषदेच्या दोन शिक्षकांना अटक केली आहे. संजय तुकाराम जाधव आणि जलील उमरखाँ पठाण अशी अटक करण्यात आलेल्या शिक्षकांची नावे आहेत. पेपरफुटी प्रकरणात या शिक्षकांचा सहभाग असल्याचा एटीएसला संशय आहे. वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या परीक्षेत (नीट) घोटाळा झाल्याचा आरोप होत आहे. लातूरमध्येही नीट व जेईईच्या तयारीसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी खासगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घेत असतात. त्यामुळे परीक्षा गैरव्यवहारात या शहराचे काही धागेदोरे आहेत का या दृष्टीने तपास सुरू होता. शनिवारी रात्री नांदेड एटीएसच्या हाती हे दोघे शिक्षक लागले. लातूरमध्ये राहणारे संजय जाधव हे मूळचे बोथी तांडा (ता. चाकूर) येथील रहिवासी. सध्या सोलापूरच्या टाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. तर, लातूरच्या अंबाजोगाई रोड भागात राहणारे जलील उमरखाँ पठाण हे तालुक्यातील कातपूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. दोघेही 'पीएचडी' धारक, खासगी क्लासेस घ्यायचे संजय जाधव व जलील उमरखाँ पठाण हे दोघेही पीएचडीधारक आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेवर शिक्षक असले तरी ते लातूरमध्ये खासगी क्लासेसही घेतात. 'नीट'चा पेपर फोडून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या रॅकेटमध्ये सहभाग असल्याच्या संशयावरून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आर्ट ऑफ लिव्हींग आयोजित श्रद्धा कोर्स संपन्न

बीड (प्रतिनिधी)- 21 जुन रोजी योगा दिवस असल्या कारणाने त्याची पुर्व तयारी म्हणून शहरातील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे दि 10 जुन 2024 ते 13 जून 2024 च्या दरम्यान आर्ट ऑफ लिव्हींग आयोजित श्रद्धा कोर्स पार पडला.सर्व शिक्षक वृंदासाठी संस्थेच्या प्रमुखांनी आणि मुख्याध्यापकांनी श्रद्धा कोर्सचे आयोजन केले होता.हा कोर्स घेण्यासाठी भूगाव,पुणे येथील श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्मिता रहाणे प्रमुख अतिथी होत्या. या कोर्सचे स्वरूप सकाळी पहाटे प्राणायाम ,योगासने ,हरी ओम ध्यान सुदर्शन क्रिया सत्संग विशेष ऍक्टिव्हिटी.



विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा प्रकारे करता येईल हे या कोर्सचे मुख्य उद्दिष्ट होते.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री जैन सर सचिव श्री पारगावकर सर मुख्याध्यापक हंसे सर उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम तसेच आर्ट ऑफ लिविंग परिवाराचे सर्व सदस्य उपस्थित होते. तसेच दरम्यान शाळेतील सर्व शिक्षकांना चहा नाश्ता आणि जेवणाची उत्तम सोय शाळेच्या वतीने करण्यात आली होती. शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी स्मिता रहाणे यांचा सत्कार शाल, श्रीफळ आणि विशेष भेटवस्तू देऊन केला. श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी व सर्वांगीण विकासासाठी अशा विविध उपक्रमांचे नेहमी आयोजन करण्यात येत असते. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## ऊसतोड मुलांचे शासकीय वस्तीगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

बीड, दि. 24 : महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण महामंडळामार्फत संत भगवान बाबा ऊसतोड मुलांचे शासकीय वस्तीगृह नाळवंडी नाका बीड येथे कार्यरत असून या वस्तीगृहाचे प्रवेश क्षमता 100 असून सदर वस्तीगृहाचे प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.

या वस्तीगृहात ऊसतोड कामगारांच्या मुलांना प्रवेश दिला जातो या वस्तीगृहात प्रवेशातील विद्यार्थ्यांना मोफत भोजन व निवास सुविधा पुरविली जाते तसेच निर्वाह भत्ता, स्टेशनरी इत्यादी सुविधा पुरविला जातात, इच्छुकांनी त्वरित संपर्क करून प्रवेश अर्ज घेऊन जावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड व गृहपाल संत भगवान बाबा ऊसतोड मुलांचे शासकीय वस्ती, नाळवंडी बीड यांनी केले आहे संपर्कासाठी मोबाईल क्रमांक 9860157364 यावर संपर्क साधावा.

# स्थानिक अपक्ष उमेदवार अक्षय महेश म्हात्रे यांना वाढता पाठिंबा

उरण/विठ्ठल ममताबादे

निवडणुकीला काहीच दिवस बाकी असताना सर्वत्र निवडणुकीचे वारे जोरदार वाहू लागले असतानाच स्थानिक अपक्ष उमेदवार अक्षय महेश म्हात्रे यांनी तळागाळात जाऊन प्रचार केला आणि त्यांना तरुणांपासून ज्येष्ठ नागरिक, शिक्षक, कामगार आणि विद्यार्थ्यांचा तसेच विविध संघटनांचा पाठिंबा मिळत आहे.. एवढे मोठे पाऊल उचलताना ज्येष्ठांचा आणि श्रेष्ठांचा आशीर्वाद घ्यावा ही त्यांची धारणा असल्याने त्यांनी थोर समाजसुधारक तसेच ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांचा आशीर्वाद घेतला व सचिन दादासाहेब धर्माधिकारी यांच्या सानिध्यात राहून जवळपास दीड तास त्यांचे मार्गदर्शन घेतले व ते घेत असताना म्हात्रे यांना चैतन्याची अनुभूती झाल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.त्याचप्रमाणे मतदार संघात प्रचार करताना अनेक ज्येष्ठ व्यक्तींनी असेही सांगितले की,आम्ही आयुष्यभर कार्यकर्ते राहिलो, पण नवतरुण कोणीतरी पुढे येत आहे याचा आम्हाला समाधान आहे आणि तुला आमचा आशीर्वाद आहे. अक्षय म्हात्रे हे स्वतः पदवीधर इंजिनिअर असून त्यांनी कॉलेज तसेच हॉस्टेल चे आयुष्य अनुभवले असल्याने त्यांना पदवीधरांच्या समस्यांची जाण आहे. १९८८ साली कोकण पदवीधर मतदार संघ अस्तित्वात आला.पण तेव्हापासून कोण कोण पदवीधर आमदार झाले किंवा त्यांची काय कामे असतात..?..त्या आमदारांनी पदवीधरांसाठी काय केले हे कोणालाही माहिती नाही.हे अक्षय म्हात्रे यांना पदवीधरांना प्रत्यक्ष भेटल्यावर समजले.आणि म्हणूनच पदवीधरांच्या न्याय हक्कासाठी आणि सन्मानासाठी तसेच पदवीधरांना स्वतःच्या हक्कांची जाणीव व्हावी आणि त्यांच्यामध्ये जागृती निर्माण व्हावी म्हणून अक्षय म्हात्रे यांनी ही निवडणूक लढविण्याचा निश्चय केला आहे.आज समाजात कितीतरी पदवीधर सुशिक्षित बेरोजगार आहेत किंवा एका फील्ड मध्ये शिक्षण घेऊन वेगळ्याच कोणत्यातरी फील्ड मध्ये जॉब करताना दिसतात.पण त्यांच्यासाठी आवाज उठवणारा कोणी हक्काचा माणूस नसल्यानेच रायगड, ठाणे, पालघर रत्नागिरी, सिंधुदुर्गसह संपूर्ण कोकणात मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी किंवा प्रकल्प असून सुद्धा स्थानिकांना कुठेतरी डावलण्यात येत आहे.कितीतरी सरकारी संस्था, शाळा, बँका, कार्यालयात जागा रिक्त आहेत किंवा होत आहेत तिथे तातडीने पदवीधरांना संधी दिली गेली पाहिजे.अनेक पदवीधर असे आहेत की त्यांचे वय निघून गेले असल्याने त्यांना कुठेही रोजगार मिळत नाही, त्यांच्यासाठी सरकारने ३-५ हजार किमान वेतन चालू केले पाहिजे.अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊन सुद्धा त्यांना संधी मिळत नाही , त्यांना संधी ही मिळालीच पाहिजे.आणि म्हणूनच मी ही निवडणूक लढविण्याचा निर्धार केला आहे अशी माहिती अक्षय म्हात्रे यांनी दिली आहे. फेसबुक, व्हॉट्स अॅप, सोशल मीडिया तसेच मीडियाच्या माध्यमातून माझा प्रचार अगदी योग्य दिशेने चालू असून मला माझ्या प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शाळा तसेच माझा डिप्लोमा कॉलेज, डिग्री कॉलेज, एमबीए कॉलेज तसेच मुंबई युनिव्हर्सिटी मधील माझे मित्र संपूर्ण कोकणात पसरले असून त्यांचा मला पूर्ण पाठिंबा आहे.तसेच माझे सर्व शिक्षकवृंद आणि विविध संघटनांनी मला पाठिंबा दर्शविला आहे.त्याच प्रमाणे हजारो लोकांचे, विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचे मला रोज कॉल येत असून दिवसागणिक मला असणारा वाढता पाठींबा लक्षात घेता मी नक्की निवडून येईन याची मला खात्री आहे. तरी आपल्या पदवीधरांचा आवाज विधानपरिषदेत पोहोचविण्यासाठी आणि आपल्या न्यायहक्क , आणि सन्मानासाठी आपला प्रतिनिधी म्हणून मला निवडून देण्यासाठी माझ्या नावासमोर १ अंक टाकून म्हणजे मला पसंती क्रमांक १ देऊन मला भरघोस मतांनी विजयी करा.असे आवाहन अक्षय म्हात्रे यांनी पदवीधर मतदारांना केले आहे. मित्रांनो आपले राजकीय पक्ष जे काही असतील, पण स्थानिक स्वराज्य संस्था जसे की, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर परिषद किंवा मग विधानसभा, लोकसभा या निवडणुकीत तुम्ही पक्षाच्या बाजूने मतदान करा.पण ही आपली पदवीधरांची निवडणूक आहे, आईवडिलांनी खस्ता खाऊन आपल्याला पदवीधर केले, आपण अभ्यास आणि मेहनत करून एवढ्यावर पोहोचलो.त्यामुळे तुम्हाला तुमचा पदवीधर आमदार निवडण्यासाठी घटनेने दिलेला अधिकार असा वाया घालवू नका.आणि मला पसंती क्रमांक १ देऊन विजयी करा. माझा विजय हा तुमचा विजय असेल.तरीसुद्धा तुम्हाला पक्षालाच मतदान द्यायचे असेल, आणि पक्षाच्या उमेदवाराला पहिली पसंती द्यायची असेल तर, मला निदान पसंती क्रमांक २ तरी द्या.म्हणजे माझ्या नावासमोर २ तरी लिहा. पण तुमची पहिली पसंती स्वतःसाठी म्हणजे आपल्या हक्काचा प्रतिनिधी निवडण्यासाठी असेल आणि म्हणून तुम्ही माझ्या नावासमोर पसंती क्रमांक १ द्याल हा मला विश्वास तसेच पूर्ण खात्री आहे असे मत पदवीधर मतदार संघांचे अपक्ष उमेदवार अक्षय महेश म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com